Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 6TH OCTOBER 1898.

Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.

## PART IX.—Marathi Acts, &c.

हिंदुस्थानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आली जनाब गव्हर्नर जनरल साहेब बहादुर यांनीं तारीख २ माहे सप्टेंबर सन १८९८ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे:—

### सन १८९८ चा आक्ट १० वा.

#### नादारीसंबंधी कित्येक बाबतींबाबत ठराव करण्यासाठीं आक्ट.

ज्या अर्थीं सन १८४८ चा हिंदुस्थानचा नादारीबाबत आक्ट याच्या १९ व्या व ७६ व्या कलमांवरून कानू करण्याचा जो अधिकार दिला आहे त्याच्या मर्यादेच्या संबंधानें शंका उत्पन्न झाल्या आहेत, आणि ज्या अर्थीं त्या शंका दूर करणें व सन १८७८ च्या जुलै महिन्याच्या एकतिसावे तारखे रोजीं मुंबई येथील न्यायाधिकारी हैकोर्टानें केलेल्या कित्येक कानू मंजूर करणें योग्य आहे; त्या अर्थीं यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे:—

१. (१) या आक्टास सन १८९८ चा हिंदुस्थानचा नादारीसंबंधी कानूंबाबत आक्ट असें ह्मणावें; आणि — लहान सरनामा व सुरुवात.

(२) तो एकदम अमलांत येईल.

२. सन १८४८ चा हिंदुस्थानचा नादारीबाबत आक्ट याच्या १९ व्या व ७६ व्या कलमांवरून कानू करण्याचा जो अधिकार दिला आहे त्यांत, आफिशियल असैनीचे हिशोब तपासण्याच्या संबंधानें, आणि आफिशियल असैनीच्या हातीं असलेल्या फंडांतून अशा तपासणीचा खर्च देण्याच्या संबंधानें व आफिशियल असैनीचा वाजवी — सन १८४८ चा हिंदुस्थानचा नादारीबाबत आक्ट याअन्वयें कानू करण्याच्या अधिकाराची मर्यादा.

खर्च, घेणी व अलावन्स हीं देण्याच्या संबंधानें कानू करण्याच्या अधिकाराचा समावेश होतो व झालेला आहे असें समजावें.

मुंबई येथील हे कोर्टानें सन १८७८ च्या जुलै महिन्याच्या ३१ व्या तारखेरोजीं केलेल्या कानू मंजूर करणें.

३. सन १८७८ च्या जुलै महिन्याच्या एकतिसावे तारखे रोजीं मुंबई येथील न्यायाधिकारी हे कोर्टानें सदरीं सांगितलेला अधिकार चालवून केलेल्या कानू यावरून मंजूर केल्या आहेत.

आफिशियल असैनीचें पेनशनदाखल अलावन्स.

४. सदरहू कोर्टाचे चीफ् जस्टिस हे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची पूर्वी मंजूरी घेऊन. हल्लींच्या आफिशियल असैनीस, त्याच्या नोकरीची मुदत, प्रकार व शर्ती यांजवर लक्ष देऊन, वाजवी व योग्य असेल तेवढी रकम, त्यानें चाकरी सोडल्यावर पेनशनदाखल किंवा पेनशनच्या ऐवजीं बोनसदाखल, अनक्लेम्ड डिव्हिडेंड अकौण्टच्या व्याजांतून देण्यास मुखत्यार आहेत.

(सही) जे. एम्. म्याक्फर्सन,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

## रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख ७ माहे सप्टेंबर, सन १८९८.

नंबर ९७५३.—हिंदुस्थानचा बारी पदार्थांविषयींचा आक्ट (सन १८८४ चा ४ था) याच्या १८ व्या कलमाच्या (१) ल्या पोट-कलमांतील ठरावांस अनुसरून, आणि हिंदुस्थान सरकारचा होम डिपार्टमेंटांतील जाहिरनामा नंबर १९६४, तारीख २ माहे सप्टेंबर, सन १८८७, यांत फर्माविल्याप्रमाणें आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांनीं, गव्हर्नर जनरल इन् कौसिन्ल यांची पूर्वी मंजुरी घेऊन, मुंबई इलाक्यांत बारी पदार्थ तयार करणें, कबज्यांत ठेवणें व विकणें यांबाबत ज्या कानू सन १८९७ चें मुंबई सरकारी ग्याझेट, भाग १ ला, याच्या १३६९ व्या व त्यापुढील पृष्ठांवर दिलेल्या नंबर ९९७९ च्या जाहिरनाम्यांत छापून प्रसिद्ध करण्यांत आल्या आहेत, त्या कानूंतील ३७ व्या कानूच्या बदला जी कानू दाखल करावयाचें योजिलें आहे तिचा मसुदा, ती कानू लागू असण्याचा संभव असलेल्या मनुष्यांच्या माहितीसाठीं, छापून प्रसिद्ध केला आहे.

२. यावरून जाहिर करण्यांत येत आहे कीं सदरहू कानूच्या मसुद्याचा, व त्यासंबंधी ज्या कोणत्याहि हरकती किंवा सूचना या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या अखेरच्या दिवसापूर्वी सेक्रेटरी निसबत सरकार, रेव्हिन्यू डिपार्टमेंट, यांजकडे येतील त्यांचा सदरहू एक महिना संपल्यावर विचार करण्यांत येईल.

---

### कानूचा मसुदा.

" ३७. हिंदुस्थानचा हत्यारांविषयींचा आक्ट (सन १८७८ चा ११ वा) यांत युद्धसामग्री या शब्दाची ज्याप्रमाणें व्याख्या केली आहे तशा युद्धसामग्रीच्या सदराखालीं येणारा कोणताहि बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याचा ज्या कोणत्याहि मनुष्यास तो आक्ट किंवा त्याअन्वयें केलेल्या कानू यांवरून कायदेशीर रीतीनें हक्क असेल त्या मनुष्याला, ह्या कानूंअन्वयें लैसेन्स घेतल्यावांचून, आपल्या स्वतःच्या खासगी उपयोगासाठीं, तो आक्ट किंवा त्याअन्वयें केलेल्या कानू यांवरून ठरविलें असेल त्या मानानें किंवा कोणतेंहि मान ठरविलें नसेल तेव्हां वाजवी मानानें तसा कोणताहि बारी पदार्थ कबज्यांत ठेवण्याचा अधिकार आहे."

आलीजा नेक नामदार गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

(सही.) जे. डब्ल्यू. पी. म्यूर-म्याकेन्झी,
सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.